| | | | |
|---|---|---|---|
| 13 | एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कथेचे बदलते स्वरूप आणि वास्तव | प्रा.डॉ. जगताप उज्वला | 138 |
| 14 | जागतिकीकरण आणि भाषा, साहित्य व संस्कृती | डॉ.लक्ष्मण गिते | 141 |
| 15 | "जागतिकीकरण आणि मराठी कथात्म साहित्य" | डॉ. सुनिल रामराव काकडे,<br>प्रा. डॉ. अनिरुध्द मोरे | 143 |
| 16 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | 147 |
| 17 | **जागतिकीकरण आणि भारतीय भाषा** | **डॉ. राम रौनेकर** | 153 |
| 18 | जागतिकीकरणामध्ये मराठी संस्कृतीचे संवर्धन आणि आव्हाने | प्रा.डॉ. रामनाथ गंगाधर वाढे | 156 |
| 19 | जागतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य | प्रा.डॉ. रामलीला सुदामराव पवार | 160 |
| 20 | जागतिकीकरण आणि भाषा | सहा. प्रा. गाडेकर छाया किसनराव | 164 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठवाड्यातील ग्रामीण कविता. | प्रा.भारत चिमाजी चव्हाण | 166 |
| 22 | जागतिकीकरण साहित्य आणि मराठी भाषा | डॉ.संदीप अ. बनसोडे | 168 |
| 23 | जागतिकीकरण आणि दलित साहित्यातील आत्मकथने | डॉ.समाधान इंगळे,<br>प्रा.शरद लक्ष्मणराव सदाफुले | 171 |
| 24 | जागतिकीकरण व ग्रामीण संस्कृती | प्रा. महानंदा संदीपान बीडकर | 175 |
| 25 | जागतिकीकरणामध्ये सूफी आणि दत्त संप्रदाय तत्त्वविचार तुलनात्मक संशोधन | प्रा. टकले जी.पी. | 179 |




Scanned by CamScanner

# जागतिकीकरण साहित्य आणि मराठी भाषा

डॉ.संदीप अ. बनसोडे
मराठी विभागप्रमुख, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई, बीड.

---------------(22)---------------

आपल्या स्वतंत्र देशात जागतिकीकरणाचा सध्या सर्वत्र बोलबाला आहे सोबतच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील 'खाउजा' म्हणजेच खाजगीकरण, उदारीकरण आणि बाजारीकरण यामुळे अर्थव्यवस्था मुक्त झाली आहे. आणि सर्व गोष्टीचा परिणाम सर्वसामान्यांवर होतोच आहे. अगदी खेडीपाडीही यातून सुटलेली नाहीत. निदान या सर्व व्यवस्थेत तरी गुणवत्तेच्या आधारावर सर्वसामान्यांना न्याय मिळेल व गुणतेवर नोकरी मिळेल असे वाटले होते मात्र सर्वांचाच हिरमोड झाला आणि गुणवत्ताधारक तरुण पोटापाण्यासाठी एक तर कमी पैशांवर कंपन्यांमध्ये गुलामासारखा राब राब राबू लागला. तर कुणी स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी दर्जाहिन व्यवसाय करू लागला जो कंपनीमध्ये राबतोय ना त्या तरुणाला नोकरी कायम राहण्याची शाश्वती आहे, आणि न उद्योग करणाऱ्या व्यावसायिकाला आपला उद्योग भरारी घेईल याची शाश्वती . या सर्वांमध्ये अधिक कुचंबना झाली ती दलितांची, शेतकऱ्यांची आणि भटक्या विमुक्तांची कारण ही मंडळी पूर्वीही उपेक्षित होती आणि आजही आहे. एकंदरीत जागतिकीकरणात तंत्रज्ञान जरी विकसीत झाले असले तरी मानवी संवेदना बोथट झाल्याचे चित्रं सर्वत्र बघायला मिळू लागले आहे.
माणूस नवीन तंत्रज्ञानात रममान झाला, चंगळवादी प्रवृत्तीत जगण्याला महत्त्व देवू लागला आणि त्यातल्या त्यात निसर्गाच्या आणि शासनाच्या उदासिन धोरणांमुळे तो कर्जबाजारी होवू लागला. त्याचा परिणाम एकंदरीत त्याच्या स्वतःच्या जीवनशैलीवर होवून तो व्यसनाधिन झाला आणि त्याच्या व्यसनाधिनतेचा परिणाम आपसूकच त्याच्या कुटुंबावर झाल्याशिवाय राहिला नाही.

**सध्याचे राजकीय मूल्ये व ग्रामीण जीवनातील वास्तव आणि साहित्य –**

ग्रामीण भागात स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचे वातावरण निर्माण झाले मात्र जागतिकीकरणामुळे बदलत्या खेड्यात राजकिय वातावरणाने फार मोठ्या प्रमाणात समाजजीवन ढवळून निघताना दिसत आहे. राजकिय पक्ष हे आता जातीच्या आधारावर निघालेले दिसतात. त्यामुळे अनेक अपप्रवृत्ती वाढीस लागलेल्या आहेत. लोकशाहीच्या माध्यमातून समाजहित जोपासून राष्ट्रविकास करणे हे मूल्य पायदळी तुडवली जाऊ लागली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 25 नोव्हेंबर 1949 ला संसदेत भाषण करताना स्वातंत्र्याच्या संदर्भात व लोकशाहीच्या संदर्भात जे भाषण केले होते. त्याचे कारण राजकारणात जातीधर्माचा मोठ्या प्रमाणातील सहभाग होय. आंबेडकरांना हे कदापी अपेक्षित नव्हते की, राजकीय पक्ष हे जातीच्या पातळीवर निघावेत. राष्ट्रापेक्षा राजकीय पक्ष मोठा नसावा मात्र आज या लोकशाहीत मानवता केंद्रीत होण्याऐवजी सत्ता हिच केंद्रवर्ती झाल्याचे दिसून येते. आणि ही सत्ता हस्तगत करण्यासाठी अनेक म्हणजेच अगदी खालच्या पातळीवर जावून षडयंत्र रचून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न सध्या होताना दिसतो. एखादी अनुचित घटना घडावी आणि संबधिताला न्याय मिळण्याऐवजी त्याचे जातीय राजकारण कसे करता येईल याचा विचार सध्याच्या युगात मोठ्या प्रमाणात दिसतो म्हणजेच मृताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचाच हा प्रकार सर्वत्र अगदी बिनबोभाटपणे चालू आहे. 'गांधारीचे डोळे' या कादंबरीतून आपल्याला ही वास्तवता दिसून येते. गांधारीने आपल्या डोळ्यावर जशी पट्टी बांधलेली आहे तशीच पट्टी इथल्या राजकिय पक्षांनी समाज जीवनाकडे पाहत असताना बांधली आहे की काय असा प्रश्न निर्माण होतो. कारण सामाजिकतेची सुस्थिती चिंतण्याऐवजी जातीयतेचे, गटातटाचे राजकारण करताना माणसाच्या मुलभूत हक्काची पायमल्ली करून प्रांतिक राजकारण वाढीस लागले आहे. आणि या राजकारणाचा परिणाम सर्वसामान्यावर कशा प्रकारे होतो याचे चित्रण आपल्याला अशोक व्हटकर यांच्या 'मेलेलं पाणी' या कादंबरीतून पहायला मिळते. तर जागतिकीकरणाच्या रेट्यात ग्रामीण समाजासमोर नवीन प्रश्न कसे उभे राहिले याचे चित्रण वामन जाधव यांनी 'नक्षत्र' या कथासंग्रहात अतिशय समर्पकपणे रेखाटल्याचे दिसते.

आज ग्रामीण भागातील माणूस अजुनही जाती जमातीच्या मर्यादेत स्वतःला अडकवून घेवू लागला आहे आणि यातच खरे सौख्य सामावले आहे असा समज शिक्षित असूनही करू लागला आहे. प्रत्येक माणूस आपापला



Scanned by CamScanner

जातसमूह शोधून शासनाकडे आरक्षणासाठी मांडू लागलेला आहे मात्र ज्या सर्वोच्च समस्या आहेत त्याकडे दुर्लक्ष करून माणूस माणसापासून दुरावत चालल्याचे चित्रण सध्याच्या समकालीन कथा साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणात उमटताना दिसून येते. 1960 नंतरची ग्रामीण कथा ही अत्यंत ताकदीने समोर आल्याचे दिसते. खेड्यापाड्यात शिक्षणाचा प्रसार व प्रचार झाल्याने बहुजनवर्ग शिक्षित झाला आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या उक्तीप्रमाणे 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते पिल्यानंतर माणूस गुरगुरल्याशिवाय राहणार नाही' हे लक्षात घेऊन स्वतःवरील अन्याय अत्याचार तो अगदी निसंकोचपणे आपल्या साहित्यामध्ये मांडू लागलेला आहे. तसे तर ग्रामीण साहित्यात रा.रं. बोराडे, आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, चंद्रकुमार नलगे, वासुदेव मुलाटे, चारुता सागर, सखा कलाल, चंद्रकांत भालेराव, द.ता.भोसले आदिंनी भर घालून साहित्यक्षेत्राला मोठे वैभव प्राप्त करून दिलेले आहे मात्र जागतिकीकरणाच्या या युगात इतर राज्यातील अनेक लेखकांनी यात भर घातली आहे.

कन्नडातील आघाडीचे साहित्यिक विवेक शानभाग यांची 'घाचर घोचर' ही कादंबरी दोन वर्षांपूर्वी इंग्रजीतून प्रकाशीत झाली. प्रादेशिक साहित्य हेच अस्सल भारतीय साहित्य याची खऱ्या अर्थाने जाणीव करून देणारी कन्नड भाषेतील ही महत्वाची साहित्यकृती आहे. भोवतालचे सामाजिक बदल अतिशय खुबीने दर्शवणारी ही कादंबरी बेंगळूरु शहरातील एका मध्यमवर्गीयांचे जीवन उलगडताना दिसते. या कहाणीचा निवेदक हाच तिचा नायक आहे. त्याची पत्नी अनिता, आई, वडील आणि नवऱ्याला सोडून आलेली बहीण मालती अशी पात्र त्यात आहेत. त्यासोबतच घरातील एकमेव कमावता पुरुष अर्थात त्याचा चुलता चिकप्पाही आहे. या सर्वांनी मिळून मसाल्यांचा घरगुती व्यवसाय सुरू केल्यानंतर त्यात मिळणाऱ्या यशामुळे ही सर्व मंडळी खुप श्रीमंत होते. सुरुवातीला पैसा खर्च करताना एकमेकांचा सल्ला घेणारी ही मंडळी नंतर मात्र आपापल्या परिने खर्च करते. कोणाचा कोणाला ताळमेळ राहत नाही. राहण्याच्या चालीरीतीमध्ये वागण्याबोलण्यामध्ये बदल होतो आणि सोबतच तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कुटुंबाबद्दलची आत्मीयता संपते. अशा प्रकारचे कथानक असलेली ही कादंबरी जागतिकीकरणाचे दुष्परिणाम दर्शवणारी अशा प्रकारची आहे.

असे जरी असले तरी या जागतिकीकरणाच्या रेट्यात मराठी भाषेची दुरावस्था होऊन चालणार नाही म्हणूनच सीमोल्लंघन करून महाराष्ट्रात आलेल्या लोकांनी इथली भाषा मराठीच व्यवहारात वापरली पाहिजे. असा आग्रह राजकारण्यांनी धरला पाहिजे. जागतिकीकरणात मराठीने आपले स्थान पक्के केल्याशिवाय मराठीचे जागतिकीकरण होणार नाही, हे ही तेवढेच सत्य. प्रत्यक्षात मात्र परभाषकांना मराठी शिकवण्याच्या पद्धतीचा पुरेसा उपयोग झाला नाही. तो योग्यपणे होणे गरजेचे आहे.

ज्यांची मातृभाषा मराठी नाही, त्यांना नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने किंवा मराठी कुलकातील शिक्षणामुळे मराठीचा वापर करण्याची गरज भासते. पण ठरलेल्या कालावधीत ठरलेल्या दर्जाचे मराठी खात्रीशीरपणे शिकता येईल, अशी सोय महाराष्ट्रात कुठेही नाही. त्यामुळे त्यांना मराठीशिवाय आपले काम भागवावे लागते आणि मग मराठीशिवाय मुंबई–पुण्यात भागते म्हणून महाराष्ट्रात मराठी दुय्यम दर्जाची ठरते आहे. असा ओरडा आपण मराठी माणसे करीत राहतो. मात्र अमराठी भाषकांना व्यावहारिक मराठी शिकविण्याची जबाबदारी कोणी घेत नाही – ना महाराष्ट्र शासन, ना महाराष्ट्रातील विद्यापीठे आणि ना कुठलीही खासगी संस्था. मराठी मातृभाषा नसलेल्या आणि मराठी शिकू इच्छिणाऱ्या मंडळींना मराठी शिकवले पाहिजे, असे आपण म्हणताना दिसतो पण करत काहीही नाही त्यामुळे जागतिकीकरणाच्या रेट्यात मराठीचा संकोच होत जाईल आणि ती हळूहळू मृत्युपंथाला लागेल, अशी भीती जरी व्यक्त होत असली तरी एक प्रगत विकसित राष्ट्र व जागतिक महासत्ता होण्याच्या मार्गावर असलेल्या भारतामध्ये उपलब्ध होणाऱ्या संधीचा लाभ घ्यायचा असेल तर भारतीय भाषांच्या अभ्यासनार्थही त्यातल्या त्यात अभिजात म्हणून भविष्यात नक्कीच दर्जा मिळणाऱ्या मराठीचे अत्याधुनिकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि हा सुदिन नक्कीच एक नवी तेजोमय पहाट घेऊन उगवेल याची मला खात्री आहे.



Scanned by CamScanner

संदर्भ ग्रंथ

1. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या, डॉ. आनंद यादव, मेहता पब्लीकेशन हाउस, पुणे, द्वितीय आवृत्ती 1994
2. ग्रामीण साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया, गो.म.कुलकर्णी, मेहता पब्लीकेशन हाऊस, पुणे, प्रथम आवृती 1999
3. मराठी कथा साहित्य एक आलेख म.ना.अदवंत निहारा प्रकाशन प्रथम आवृत्ती, 1993
4. मराठी ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही : संपा. वासुदेव मुलाटे, सुनील मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे प्र. आ.2002
5. ग्रामीण साहित्य रा.र.बोराडे, साकेत प्रकाशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती 1992
6. अंगार माती : भास्कर चंदनशिव, बाबा मांड साकेत प्रकाशन औरंगाबाद प्र.आ.1991
7. साहित्य आणि समाज : प्रस्तावना संपा. प्रा. नाथनाथ कोत्तपल्ले प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2007
8. दै. दिव्य मराठी, रसिक पुरवणीतील लेख जानेवारी 2018 मधील
9. मराठवाड्याची कथा संपादक डॉ.वासुदेव मुलाटे साहित्य प्रकाशन औरंगाबाद प्र.आवृत्ती 1994
9. मराठी कथा : रूप आणि परिसर म.द.हातकणंगलेकर संपूर्ण प्रकाशन औरंगाबाद प्र. आवृत्ती 1986



Scanned by CamScanner